महाराष्ट्र पोलीस

ठाणे शहर

क्र.पोउपआ/वाहतुक/अधिसुचना/७९ /१६,
पोलीस उपायुक्त, वाहतुक विभाग, यांचे कार्यालय,
ठाणे शहर दिनांक :– २१ /१०/२०१६.

## –: वाहतुक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, ठाणे शहरामध्ये अनेक शाळा, अनेक शैक्षणिक संस्था असुन त्यात अनेक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. बहुतांश शाळा सकाळ व दुपार अशा दोन सत्रामध्ये सुरु होत असुन अनेक इयत्तांची शाळा भरण्याची व सुटण्याची वेळ एकच असल्याने शाळेच्या तसेच आजुबाजुच्या परीसरात एकाचवेळी वाहतुक कोंडी होत आहे ; आणि,

ज्याअर्थी, बहुतांश शाळांमध्ये त्यांच्या स्कुल बसेस, व्हॅन इत्यादी पार्किंग करिता स्वत:ची जागा नसल्याने त्या स्कुल बसेस, व्हॅन रस्त्यावरच थांबवुन शालेय विद्यार्थ्यांची चढ–उतार करित असल्याने रस्त्यावर वाहतुक कोंडी होउन शालेय मुलांच्या सुरक्षेस देखील बाधा निर्माण होत आहे ; आणि,

ज्याअर्थी, विद्यार्थ्यांचे पालक त्यांचे पाल्यास शाळेत सोडावयास व घेउन जाण्यास स्वत:च्या खाजगी वाहनाने येउन अशी वाहने शाळेच्या बाहेर उभी करित असल्याने शाळेच्या परीसरातील वाहतुक कोंडीत भर पडत असुन अन्य वाटसरुंना या परिसरातुन मार्ग काढणे जिकिरीचे होत आहे ; आणि,

ज्याअर्थी, शाळेच्या स्कुल बसेस, व्हॅन तसेच पालकांच्या खाजगी वाहनांमुळे शाळा भरण्याच्या व सुटण्याच्या वेळेस शाळेच्या बाहेरील परिसरात होणा–या वाहतुक कोंडीच्या वेळी बेदरकार वाहन चालकांमुळे पाल्य तसेच पालकांच्या सुकर मार्गक्रमणास धोका संभवत असल्याने त्यांची सुरक्षा विचारात घेउन शाळेच्या बाहेरील परिसरातील वाहतुक सुनिश्चित करणे आवश्यक आहे, अशी माझी खात्री झाली आहे ;

त्याअर्थी, मी, संदीप भा.पालवे, मला ठाणे शहर वाहतुक विभागाचा पोलीस उपायुक्त म्हणुन महाराष्ट्र शासन, गृहविभाग क्र.एम.व्ही.ए.११६/सीआर/३७/टीआर दि.२७–०९–१९९६ चे अधिसुचनेनुसार व मोटार वाहन कायद्याचे कलम ११५, ११६(१)(अ)(ब) अन्वये प्राप्त अधिकारानुसार व त्याअनुषंगिक कर्तव्यार्थ खालीलप्रमाणे अधिसुचना निर्गमित करित आहे :–

१. ज्या शाळांची वाहन पार्किंगची स्वत:ची व्यवस्था आहे, त्यांनी त्यांच्या स्कुल बसेस व व्हॅन रस्त्यावर उभ्या न करता शाळेच्या आवारात उभ्या करुन विद्यार्थ्यांची चढ–उतार करावी. तसेच पाल्यांची शाळेत ने–आण करणा–या पालकांची खाजगी वाहने देखिल शाळेच्या आवारात उभी करावित.

२. ज्या शाळांची स्वत:ची पार्किंग व्यवस्था नाही, त्यांनी त्यांच्या स्कुल बसेसमुळे तसेच पालकांच्या वाहनांमुळे विद्यार्थ्यांची चढ–उतार करताना कोणत्याही परिस्थितीत रस्त्याच्या एकापेक्षा जास्त मार्गीका अडल्या जाणार नाहीत हे सुनिश्चित करावे.

३. शाळा भरण्याच्या व सुटण्याच्या वेळी शाळेच्या परीसरातील वाहतुक सुनिश्चित ठेवण्यासाठी शाळेने प्रती १० मीटर अंतरासाठी एका ट्रॅफिक वॉर्डनची नियुक्ती करावी.

सदरची अधिसचुना निर्गमित केल्यापासुन पुढील सहा महिन्यांकरिता अंमलात राहील. याकालावधित काही सुचना / आक्षेप असल्यास ते लेखी स्वरुपात पोलीस उपायुकत, वाहतुक नियंत्रण विभाग, तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, ठाणे (पश्चिम) येथे कळवावेत. सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्यापासुन सहामाहित काही सुचना व आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढे सदरची अधिसुचना कायमस्वरुपी अंमलात राहील.

( संदीप भा. पालवे )
पोलीस उपायुक्त,वाहतूक विभाग,
ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे
२/– या अधिसुचनेची प्रसिध्दि करणेस आपणास विनंती करणेत येत आहे.

प्रत कार्यवाहीसाठी :– सर्व सदस्य, जिल्हा स्कुल बस सुरक्षितता समिती, ठाणे शहर

प्रत मा.सविनय सादर
मा.पोलीस आयुक्त सो, ठाणे शहर. / मा.पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर / जिल्हाधिकारी, ठाणे.

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी सविनय सादर
१. मा.आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
२. मा.मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे.
३. प्रादेशिक परीवहन अधिकारी, ठाणे.

प्रत कार्यवाहीस्तव :– सपोआ.ठाणे, कल्याण, भिवंडी व उल्हासनगर वाहतुक उपविभाग.

प्रत कार्यवाहीस्तव :– सर्व ट्रॅफिक युनिट प्रभारी अधिकारी, वाहतुक विभाग, ठाणे शहर.

प्रत:– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी